**<u>विशेष दिवाणी दावा नं.४५३/२०२३(नि.५६ लगत)</u>**

**<u>जादा सरतपास वादीतर्फे अॅड. ओ. ए. वाकनीस यांच्यातर्फे सुरु-</u>**

१. मला आता कागदयादी नि.क्रं.३९ लगत अ.नं.१ चा दस्त दाखविणेत आला. सदरचा दस्त हा साठेखताचा आहे. सदरचा दस्त बाळु सखाराम जाधव यांनी जिंदाल डेव्हलपर्स तर्फे मोहन खेमचंद अग्रवाल यांना करुन दिलेला आहे. सदरचा दस्त हा गट नं.३६१ चा आहे. सदर दस्तावर लिहुन देणार बाळु सखाराम जाधव व लिहुन घेणार जिंदाल डेव्हलपर्सतर्फे मोहन अग्रवाल यांच्या सहया आहेत. तसेच साक्षीदार म्हणुन माझी व रमेश अग्रवाल यांची सही आहे. सदर दस्तातील मजकुर खरा व बरोबर असुन त्यावरील सहया माझ्यासमक्ष केलेल्या आहेत. सदर साठेखतास **<u>नि.क्र.५७</u>** देणेत येते

**<u>उलटतपास प्रतिवादीतर्फे अॅड. आय. डी. खान यांचेतर्फे</u>**

२. वादी पुणे येथील राहणारे असुन आम्ही खंडाळा येथे भेटलो होतो. माझे मित्र शरद दोषी यांच्यामार्फत आमची भेट झाली होती. माझ्यासमोर दस्तावर सहया झाल्या व दस्तातील नमुद रक्कम देण्यात आली. आमची भेट भुमी अभिलेख कार्यालयाच्या बाहेर झाली होती. हे मला सांगता येणार नाही की सदरचा दस्त कोणी टाईप केला व तो किती वाजता टाईप केला. हे म्हणणे खरे आहे की वादी व आम्ही दोघे साक्षीदार एकाच कम्युनिटीचे आहोत. हे म्हणणे खरे आहे की जागा मी बघितलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की रक्कम रुपये १७,५५,०००/- चा व्यवहार ठरला होता हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की वादी व आम्ही दोन्ही साक्षीदार पुणे येथे जवळ जवळ राहतो. हे मला सांगता येणार नाही की जिंदाल डेव्हलपर्स ही फर्म आहे किंवा कसे. मी साठेखतावर पुणे येथे सही केली. पुणे येथे मी शरद दोषी याच्याबरोबर होतो व वादीने साक्षीदार म्हणुन सही करा असे सांगितल्यावर मी सही केली. हे म्हणणे खरे आहे की प्रत्यक्षात वादी व प्रतिवादींमध्ये अंतर्गत जो व्यवहार ठरला होता तो मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की वादीच्या इतर एक-दोन दस्तांवर माझ्या सहया आहेत. पुणे येथे आम्ही दोन साक्षीदार आणि लिहुन देणार व लिहुन घेणार उपस्थीत होतो. हे म्हणणे खरे नाही की खंडाळा येथे

प्रतिवादीला मी पाहिलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की खंडाळा येथे दुसरा साक्षीदार रमेश उपस्थित नव्हता. हे म्हणणे खरे नाही की मी, मोहन अग्रवाल व रमेश अग्रवाल यांनी संगनमताने प्रस्तुतचा बोगस दस्त तयार केला. हे मला माहित नाही की प्रतिवादी हा त्याच्या मामाची म्हणजेच दुधाणे यांची मिळकत घ्या असे सांगत होता अगर कसे. हे म्हणणे खरे आहे की स्टॅम्प कोणी खरेदी केला, कधी खरेदी केला व कुठे खरेदी केला याची मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की मी गंगाधाम पुणे येथे राहतो व ते ठिकाण पुण्यातील मार्केटयार्ड जवळ आहे. मी नोटरी पोटे यांच्याकडे सही केली. हे म्हणणे खरे नाही की प्रतिवादीला १०,०००/- रुपये रोख रक्कम दिले व रक्कम रुपये १,४०,०००/- चा चेक दिला हे मी खोटे सांगत आहे. हे मला निश्चीत सांगता येणार नाही की पोटे यांच्याकडे किती वेळ काम चालले व किती वाजता काम झाले. हे म्हणणे खरे नाही की प्रतिवादीचे मामा दुधाणे हे आजारी होते व झोपुन होते आणि त्यांची प्रॉपर्टी विकुन पैसे आणा असे त्यांनी सांगितले असल्याचे मला माहिती आहे. हे म्हणणे खरे आहे की दस्त होण्यापुर्वी व दस्त झाल्यानंतर मी कधीही दावा मिळकतीकडे गेलेलो नाही. हे म्हणणे खरे नाही की नि.क्रं.५७ वरील दस्त बनावट आहे. हे म्हणणे खरे नाही की आम्ही तिघांनी संगनमत करुन प्रतिवादीला बनावट व्यवहारात अडकवले आहे. हे म्हणणे खरे नाही की माझ्या सरतपासातील संपुर्ण मजकुर खोटा आहे व आजरोजी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की वादी अग्रवाल हे माझे नातेवाईक असल्याने मी त्यांच्या बाजुने साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण. फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

स्थळ : वाई.
दिनांक : ०३.१०.२०२५

(ए. ए. पाचरणे)
सह दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर,
वाई.